---

**<u>पुढील सरतपास साक्षीदरा क्र.१ चा शपथेवर सुरु</u>**

**१.** आरोपी तर्फे प्रश्न पत्री केला निशाण देण्यास हरकत घेण्यात आली होती. साक्षीदाराने स्वताःहून कागद पोलिसाणा दिले असून त्यावर त्यांची सही आहे. त्यामूळे आताच्यादक्षनी प्रश्न पत्रीकेला निशाण क्रमाक देवून ते शाबीत झाले किंवा नाही हे पुरावा संपल्यानंतर अतिम युक्तिवाद व निकालाच्या वेळेला ठरवण्या येईल.

२. मला प्रश्न पत्रीका दाखवली ती हीच आहे यावर माझी एस.बी. विश्वरूपे म्हणून दिनांक २७.११.२०१३ रोजी पंचानच्या समक्ष पोलिसाना दिली म्हणून ती सही मी ओळखतो. या प्रश्न पत्रीकेला नि.५८ देण्यात येते. आरोपीना मी ओळखतो ते आज रोजी माझ्या समक्ष दोन आरोपी आहे.

**<u>उलटतपासणी आरोपी क्र. २ करीता श्री. व्ही. आर. धडे , विधिज्ञ यांचे द्वारा–</u>**

३. हे म्हणणे खर आहे की, मी फिर्याद देई पासून ते पुरवणी जबाब देईपर्यन्म मला अरोपीचे नाव माहित नव्हती. आमच्या कडे अतिरिक्त काम तयार झाल्यास आमच्या कार्यलयात रोजनदारीवर कर्मचारी बोलावले जातात व काम करुन घेतले जाते. मी हे कर्मचारी स्वताःबोलव नाहीत ते कार्यलयीन कर्मचारी बोलावतात. आमच्या कार्यालयातील महिंद्र बावर हे रोजनदारी कर्मचारी बोलावतात. आमच्या कडे महिंद्र बावर हे कधीपासून कर्मचारी आहे हे मला माहित नाही. मी सदया सेवा निवृत्त आहे. मी त्याविभागातून दिनांक १२.१२.२०१३ रोजी बदली झालो. त्यांनतर मला माहित नाहीत पण तो पर्यत्न बावर तेथे निवूक्त होते. रोजनदारीच्या कर्मचा–याच्या ई–३००१ या हेड खाली पगार देतो. आमच्या कार्यालयातील नाकाडे हे कार्यालयी अधिक्षक होते. ते हे सर्व काम पाहत होते. रोजनदारीच्या कर्मचा–याचा हजरी पट ठेवले जात नाही. ज्या खात्यावरुन रोजनदारी कर्मचा–याचे पगार जात त्याचा खाते उतारा पोलिसाना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कडे राहूल

मकासरे  नावाची व्यक्ती कधीही, कायम किंवा रोजनदारीवर नोकरीला नव्हती.  हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कडे अशिव्यक्ति नोकरीलाच नसल्यामूळे त्यांना पगार दिल्याचे कागद किवां उतारा कार्यालयात नाही.

४.		मुख्य कार्यालयातून प्रश्न पत्रीका आल्यानंतर त्या प्रश्न पत्रीका श्री. धुत व श्री. चौधरी यांच्या ताब्यामध्ये ठेवल्या जातात.  हे म्हणणे खरे आहे की, प्रश्न पत्रीका आल्यानंतर त्या अतिशय गोपणी पध्दतीने ठेवल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की, मी व ही दोघेजन सोडून अन्य आमच्या कार्यालयातील लोकाना प्रश्न पत्रीकेची माहिती नसते साक्षीदार सांगताकी परिक्षा विभागातील लोकाना माहिती असते.  हे म्हणणे खरे नाही की, प्रश्न पत्रीका मूख्य कार्यालयातून आल्यानंतर वितरीत होईपर्यत्न त्याची जबाबदारी माझ्या कडे असते. मी नियंत्रण अधिकारी असतो व इतर कर्मचारी असे सगळे मिळून प्रश्न पत्रीका वितरणाची जबाबदारी असते.  आम्ही तिगे सोडून एक कर्मचारी राजेश पुरी आणि एक शिंदे हे साय्यक व अन्य जण ज्याचे नाव मला आठवत नही.  मला कोणत्याही प्रकारचा विसरण्याचा अजार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा सहा जणा व्यतिरिक्त अन्य कोणी नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा तिन कर्मचा–या व्यतिरिक्त अन्य काही कर्मचारी तिथे काम करतात याची माहिती आमच्या मुख्य कार्यालयाला असते. हि माहिती मुख्य कार्यालयाला ई–मेल करुन पाठवली जाते. मी राहूल मकासरे आमच्याकार्यालयात निवूक्त होता जो रोजनदारीवर होता याबददल मूख्य कार्यालयाला कळवले असा कागद मी हजर केलेला नाही. मी राहून मकासरे आमच्या कार्यालयात कधीही रोजनदारीवर काम केले कोणता कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सर्व कर्मचारी व रोजनदार यांना पगार बॉक खात्याव्दारे जातो. हे म्हणणे खरे नाही की,  रोजनदारी कर्मचारी पगार खात्याव्दारा घेतात.

५.		हे म्हणणे खरे नाही की,  पेपर फुटीची बातमी वर्तमान पत्रात आली म्हणूनच मी खोटी गोष्ट करुन फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पेपर वितरण करण्यासाठी इतर लोकाची मददत घेतो.  हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या चुकी मुळे आरोप गरीबावर लावला. हे म्हणणे खरे नाही की,  आरोपी क्र.२चा या घटनेशी अथवा आमच्या कार्यालयाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की,  मी खोटी फिर्याद दाखल करुन खोटी साक्ष देतो.

## उलटतपासणी आरोपी क्र. ३ करीता श्री. पी.पी.गीरी, विधिज्ञ यांचे द्वारा–

६. हे म्हणणे खरे आहे की, आलेल्या सर्व प्रश्न पत्रीका हया जीम खाना सरकारी तंत्रनिकेतन येथे ठेवल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, तिथे एक स्टॉगरुम म्हणजे एक हॉल ज्या मध्ये प्रश्न पत्रीका ठेवल्या जातात व बाहेर पोलिस असतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रश्न पत्रीका आल्यानंतर वितरण केद्राच्या अधिकारा–याना दुस–या दिवशी बोलावले जाते . हे म्हणणे खरे आहे की, वितरण आधिक–याला त्याच्या कडे आधिच यादी असते की, त्याला किती प्रश्न पत्री असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या यादी प्रमाणे वितरण अधिकारी प्रश्न पत्री का ताब्यात घेतात. हे म्हणणे खरे आहे की, सर्व प्रश्न पत्रीका संच या अगोदरच सिल होउन आलेल्या असतात. हे म्हणणे खरे आहे की, एखादी प्रश्न पत्रीका संच कमी पडल्यास तिथे वितरण आधिकारीला पूरवली जाते. परिक्षेच्या आठ दिवस आगोदर वितरण अधिक–याना प्रश्न पत्रीका पाठवल्या जातात. वितरण केंद्रात सुध्दा स्टॉगरुम असतात. तिथे पोलिस बदोबस्त असतो. हे म्हणणे खरे आहे की, वितरण अधिकारी त्या प्रश्न पत्रीका संच सभाळ ठेवणे व परिक्षेच्या वेळे देणे अशी जबाब दारी पार पाडतो. हे म्हणणे खरे आहे की, वितरण अधिकारी ही जाबाबदारी पार पाडतो की नाही हे पाहण्यासाठी आमच्या कार्यालयातील एक आधिकारी एका टिम सोबत भेटी देत असतो. प्रत्येक महाविद्यालय प्रश्न पत्रीका मिळण्यासाठी त्यांचे वाहन वितरण केद्रकाडे पाठवते. वितरण आधिकारी व कोन्टोलर सर्व श्हा निशा करुनच प्रश्न पत्रीका देतात. प्रश्न पत्री क्र.१७ १०४ च्या सख्येच्या जूळवणी बाबत प्रश्न निर्माण झाला होता. प्रश्न पत्री क्र. १७ १०४ ची एकुण ११२९ पाकीटे वितरीत करण्यासाठी मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, २२ पाकिटे अतिरिक्त पाकिटे अतिरिक्त मागणि प्रमाणे मागीवीतली होती. २६ पाकिटे सुपरलेट इन्व्हेटरी व १०८१ मुख्य इन्व्हेटरी मधुन मागिली. हे म्हणणे खरे आहे की, मुख्य इन्व्हेटरी प्रमाणे ४६ प्रश्न पत्रीका संच वितरणकेंद्र क्र.८० याना मिळणे आपेक्षीत होते. हे म्हणणे खरे आहे की, हे पाकीटे वितरण केंद्र क्र.८० घेत असताना एक पाकिट कमी मिळाले असे त्यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रमाणे आम्ही वितरण क्र.८० कडून लेखी पत्रघेवून एक पाकिट दिले. हे म्हणणे खरे आहे की, सुपरलेट इन्व्हेटरी मधुन वितरण क्र. ८० ला एक पाकिट आम्ही दिले. हे म्हणणे खरे आहे की, वितरण क्र.८० व इतर केंद्रे यांना सुपरलेट इन्व्हेटरी एकूण ५ पाकिट देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की,

अभिलेखावर सुपरलेट इन्व्हटेरी वरुन पाकिटाचे वाटप केल्यावर उरवरीत २१ पाकिटे सिल्लख राहिली. हे म्हणणे खरे आहे की, या २१ पाकिटा मधून एक पाकिट पोलिसाना पंचनाम्यासाठी दिले. फिर्यादी नंतर अभिलेखावर सुपरलेट इन्व्हेटरीतील २० पाकिटे मिळाली. आमृत वाहिनी तंत्रनिकेतन माहाविद्यालय, वितरण केंद्र क्र.८० यांना प्रश्न पत्रीका पाकिटाची नोंद अभिलेखावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनतर जेवढी पाकिटे असायला पाहिजे होती ती सर्व मिळून आली. हे म्हणणे खरे आहे की, वितरण केंद्र अधिकारी हे त्यांच्या कडील सर्व पाकिटाचे दावेदार होते.

७. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या क्र.३ च्या ताब्यात कोणतीही प्रश्न पत्रीाक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ कोणताही गुन्हा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.३ ने प्रश्न पत्रीका संच च वितरण होईल असे कृत्य केलेले नाही.

**उलटतपास पुर्ण.**
समक्ष
sd–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– ०४/०२/२०२५

**फेरतपास नाही.**
श्रवणोत्तर स्वीकृती.
sd–
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद